MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



ततत्कालीन बीड जिल्ह्यातील समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम.शिंदे यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेतील जिल्ह्याला उद्दिष्ट असलेले प्रस्ताव आचारसंहितेच्या अगोदर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन मंजूर करण्यात आले.परंतु बीड तालुक्यातील ग्रामीण उद्दिष्ट व्यतिरिक्त १०७ रमाई घरकुल योजनेची पालकमंत्री यांची दिशाभूल करून मंजुरी घेतली. पंचायत समिती बीड मार्फत मंजुरीसाठी कोणताही प्रस्ताव आलेला नसतानाही अंधारात ठेऊन दिशाभूल करून मंजुरी घेतली.

रमाई घरकुल योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत ग्रामसभेत मंजूर करून सदर प्रस्ताव पंचायत समितीला पाठवले जातात त्यानंतर पंचायत समिती त्या प्रस्तावाची छाननी करते. त्यानंतर हे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पंचायत समिती कडून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड पाठवले जातात.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२६१ | गुरूवार दि.१३ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -261 | THURSDAY DT. 13 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्ह्यामध्ये दहा हजार घरकुल घोटाळा

पालकमंत्री धनंजय मुंडे यांना अंधारात ठेवून अधिकारी कर्मचारी सरपंच ग्रामसेवक यांनी दहा हजार घरकुलाचा बीड जिल्ह्यामध्ये घोटाळा

बीड ।प्रतिनीधी

जिल्ह्यातील ११ तालुक्यातील पंचायत समितीचे बीडिओ विस्ताराधिकारी पंचायत समितीचे घरकुल चे इंजिनियर समाज कल्याणचे अधिकारी क्लार्क यांनी अक्षरशः गाव पातळीवरील सरपंच ग्रामसेवक नेतेमंडळी ग्रामपंचायत सदस्य यांना हाताशी धरण अक्षरशः लाखो रुपयाचा मलिदा खाऊन गोरगरिबांच्या डोक्यावरील छत्र हिरावून घेण्याचा प्रयत्न केला आहे याची सकल चौकशी झाली का दहा हजार घरकुल बीड जिल्ह्यामध्ये नक्कीच बोगस निघतील मात्र शंका नाही.

अकरा तालुक्यातील पंचायत समितीमध्ये अक्षरशा घरकुल प्रकरणात नंगानाच सुरूच बीड पंचायत समिती १०७ घरकुल मंजुरी बीड पंचायत समितीचे व्हिडिओ विस्ताराधिकारी म्हणतात शिंदे यांनी दिलेले १०७ घरकुल हे नियमबाह्य? तत्कालीन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम. शिंदे यांनी पालकमंत्र्यांना अंधारात ठेवून नियमबाह्य १०७ घरकुलास घेतली मंजुरी कोणत्या दिली?

बीड ।प्रतिनीधी

ततत्कालीन बीड जिल्ह्यातील समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम.शिंदे यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेतील जिल्ह्याला उद्दिष्ट असलेले प्रस्ताव आचारसंहितेच्या अगोदर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन मंजूर करण्यात आले.परंतु बीड तालुक्यातील ग्रामीण उद्दिष्ट व्यतिरिक्त १०७ रमाई घरकुल योजनेची पालकमंत्री यांची दिशाभूल करून मंजुरी घेतली. पंचायत समिती बीड मार्फत मंजुरीसाठी कोणताही प्रस्ताव आलेला नसतानाही अंधारात ठेऊन दिशाभूल करून मंजुरी घेतली.

रमाई घरकुल योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत ग्रामसभेत मंजूर करून सदर प्रस्ताव पंचायत समितीला पाठवले जातात त्यानंतर पंचायत समिती त्या प्रस्तावाची छाननी करते. त्यानंतर हे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पंचायत समिती कडून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड पाठवले जातात. व जिल्ह्याचे पालकमंत्री या कमिटीचे अध्यक्ष असतात परंतु आर.एम. शिंदे व नितिन राठोड यांनी बीड पंचायत समिती मार्फत प्रस्ताव दाखल नसतानाही.स्वतःचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी बोगस लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी मिळवून दिली. मागासवर्गीय प्रवर्ग सोडून इतर लाभार्थी असण्याची शक्यता आहे. याबाबत बीड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी १५ मे २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड यांना पत्र लिहिले असून १०७ लाभार्थ्यांना कुठल्या कागदपत्राच्या आधारे अथवा या कार्यामार्फत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यात आलेले नसतानाही त्यांच्या नावे घरकुल मंजूर केलेले आहे. यामध्ये मोठा आर्थिक गौरव्याहार झाल्याची शक्यता दिसून येत आहे. सदरील लाभार्थ्यांचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती ला प्राप्त नव्हते. व या कार्यालया मार्फत



आपल्याकडे प्रस्ताव सादर न करता थेट घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्या लाभार्थ्यां संदर्भात पुढील कार्यवाही याबाबत वरिष्ठ पातळीवर पत्र व्यवहार केला आहे. याची प्रत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांना गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी दिली आहे.

अशाप्रकारे आर.एम.शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकारच्या अनियमित्ता केल्या आहेत. या प्रकरणात त्यांची विभागीय चौकशी देखील चालू आहे.सदरील प्रकारात त्यांच्यावर योग्य ती कारवाई कधी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

तत्कालीन समाज कल्याण आयुक्त आर्यन शिंदे यांच्या कार्यक्रमांमध्ये झालेले आहे व ते घरकुल नियम आहे असल्याची चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये जो करत आहे पंचायत समिती बीड यांनी सुद्धा हे १०७ घरकुल कोणत्या पोटातून दिले व कोणत्या नियमावर दिले समाज कल्याण अधिकारी शिंदे यांनी दिलेले घरकुल हे नियमबाह्य असल्याचे चर्चा पंचायत समितीमध्ये रंगू लागली आहे परंतु बीड जिल्ह्यामध्ये एकूण आज पर्यंत झालेल्या घरकुलांमध्ये सुमारे दहा हजार घरकुल हे बोगस पद्धतीने मिळण्याची दाट शक्यता आहे तर यावेळी काही लोकांना आर्थिक तडजळीमध्ये भरपूर देण्यात बीड जिल्ह्यातील नेते मंडळी कार्यकर्ते सरपंच ग्रामसेवक अधिकारी पंचायत समितीचे व्हिडिओ विस्तार अधिकारी इंजिनिअर समाज कल्याण अधिकारी कर्मचारी यांच्याकडून अक्षरशा चालू आहे सुमारे दहा हजार घरकुलांचा घोटाळा बाहेर येणार असल्याने अनेक विस्तार अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यांमध्ये हे घरकुल घोटाळे असून लवकरच सायंकाळी महाराष्ट्रामध्ये घोटाळे बाहेर काढणार आहे

## वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दिड हजार गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### कठोर मेहनत करून उज्वल भविष्य घडवा - अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके

अंबाजोगाई ।प्रतिनीधी

सध्याच्या वेगवान युगात उज्वल भविष्य घडविण्यासाठी कठोर मेहनत करा. उत्तुंग यश मिळविण्यासाठी प्रामाणिक मेहनतीशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन अंबाजोगाईच्या अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी केले. वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आ. नमिता मुंदडा यांनी आयोजित केलेल्या गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्यात त्या बोलत होत्या.

रविवारी (दि.०९) अंबाजोगाईत वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दहावी, बारावी, छएएढ, उएढ, अबकास परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन कराणाऱ्या केज विधानसभा मतदार संघातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरवाचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. अतिशय बारकाईने शोध घेऊन मतदार संघातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कारासाठी आमंत्रित करण्यात आले होते. या समारंभात तब्बल दिड हजार गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. राजकीय, प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, भेटवस्तू देऊन या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक आणि सन्मान करण्यात आला. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपअधीक्षक चोरमले, तहसीलदार विलास तरंगे, प्राचार्य पंजाबराव खारकर, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्रा. बाबू खडकभावी, प्रख्यात गझलकार मुकुंद राजपंखे, डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी, माजी उपनगराध्यक्ष शेख रहीम, प्रा. रोहिणी पाठक, डॉ. नितीन कांबळे, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की, पत्रकार अविनाश मुडेगावकर, अभिजीत गाठाळ उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. नमिता मुंदडा यांनी सर्व गुणवंतांचे कौतुक केले. प्रत्येक वर्षी गुणवंतांची संख्या वाढत असल्याबद्दल विशेष आंनद व्यक्त करून त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहनप्र शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी देखील गुणवंतांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय मुंदडा यांनी तर सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी केले. आभार ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



### करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणार : अक्षय मुंदडा

स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांच्या संकल्पनेतून २००५ साली प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याची सुरुवात झाली. सुरुवातीला बोटावर मोजण्याएवढी असणारी गुणवंतांची संख्या आता हजारात पोहोचली असल्याचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी सांगितले. मतदार संघातील विद्यार्थी करिअरच्या यीग्य वाटेने जावेत यासाठी आगामी काळात तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित करणार असल्याचे आमदार नमिता ताई अक्षय मुंदडा यांनी सांगितले.

### विविध शाळांचाही सन्मान

मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियान अंतर्गत यश प्राप्त करणाऱ्या केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील तीन जिल्हा परिषद शाळा आणि तीन खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांचाही या समारंभात विशेष सन्मान करण्यात आला.

## स्वाराती रुग्णालयातील कालबाह्य झालेली सीटी स्कॅन मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु

### आ. नमिता मुंदडांचे प्रयत्न यशस्वी; नवीन मशीनसाठी प्रयत्न सुरु

अंबाजोगाई ।प्रतिनीधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन मागील सात महिन्यापासून बंद पडली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यानंतर अनेक अडचणींवर मात करत हि मशीन तात्पुरत्या अवस्थेत पुन्हा सुरु करण्यात यश मिळाले आहे. त्यामुळे अति अत्यावस्थ रुग्णांची गैरसोय टळणार आहे. दरम्यान, कालबाह्य झालेली सध्याची मशीन कितपत चालेल याबाबत शंका असल्याने आ. नमिता मुंदडा यांनी नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी युद्धपातळीवर पाठपुरावा सुरु केला आहे.

अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयाचा अंबाजोगाई, बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मोठा आधार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी अत्यल्प दरात अद्यावत यंत्रसामुग्रीद्वारे तपासणी करून उपचार होत असल्याने येथे रुग्णांची दररोज प्रचंड गर्दी असते. मात्र, मागील सात महिन्यापासून येथील सीटी स्कॅन मशीन बंद पडल्याने रुग्णांची गैरसोय होऊ लागली होत. सर्व सामान्यपणे सीटी स्कॅन मशीनचे आयुष्य १० वर्षांचे असते, मात्र स्वाराती रुग्णालयातील मशीनला १२ वर्षे झालेली आहेत. त्यामुळे केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे नवीन मशीनसाठी पाठपुरावा सुरु केला. परंतु, हि प्रक्रिया वेल्काहू असल्याने तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात जुनी मशीन देखील सुरु करावी यासाठी आ. मुंदडा यांनी प्रयत्न सुरु केले. परंतु बिले थकल्याने फिलिप्स कंपनीकडून योग्य प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर आ. मुंदडा यांनी पुढाकार घेत अधिष्ठाता आणि फिलिप्स कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतःच्या निवासस्थानी बैठक घेतली. त्यानुसार, फिलिप्स कंपनीचे गतवर्षीचे थकीत ४७ लाख रुपयांचे यावर्षी डिसेंबरपर्यंत टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरले. तसेच चालू वर्षाचे संपूर्ण ४४ लाख रुपयांचे बिल देण्याऐवजी ११ लाख रुपये लेबर चार्जमध्ये मशीन दुरुस्त करून देण्यासाठी आ. मुंदडा यांनी फिलिप्स कंपनीला तयार केले. दरम्यान, रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी इतर रुग्णालयाच्या अधिष्ठातांशी संपर्क साधून त्यांच्याकडील कालबाह्य झालेल्या मशीनचे चालू असलेले सेकंद हॅण्ड पार्ट देण्यासाठी विनंती केली. सर्व प्रशासकीय प्रक्रिया पार पडल्यानंतर मशीनचे जुने पार्ट उपलब्ध झाले. त्यानंतर फिलिप्स कंपनीच्या तंत्रज्ञांनी स्वाराती मधील मशीनला हे पार्ट जोडून मशीन सुरु करून दिली. त्यामुळे सद्यस्थितीत तरी अति आवश्यक रुग्णांसाठी या मशीनचा वापर करणे शक्य होणार असल्याने रुग्णांना दिलासा मिळाला आहे.



### मशीन सुरु झाली, काळजी घेणे आवश्यक

कालमर्यादा संपूनही रुग्णांची गरज लक्षात घेता सध्याची मशीन कार्यान्वित करण्यात आली आहे. जुनी असल्याने मशीन लवकर गरम होत आहे. मशीनचा सतत वापर करणे शक्य नसून अधूनमधून खंड देणे गरजेचे आहे. त्यामुळे केवळ अति अत्यावस्थ रुग्णांसाठीच मशीनचा वापर करण्यात येणार आहे. अडचण लक्षात घेता रुग्ण आणि नातेवाईकांनी सहकार्य करावे.- डॉ. शंकर धपाटे, अधिष्ठाता

### नवीन मशीनसाठी प्रयत्नशील

'स्वाराती'मध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या पाहता सध्याची मशीन कालबाह्य झाल्याने राज्य शासनाकडे नवीन मशीनची मागणी केली आहे. त्यासाठी सर्व स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरु असून त्यास लवकरच यश मिळेल. तोपर्यंत तात्पुरत्या अवस्थेत जुनी मशीन सुरु करून घेतली आहे. केवळ अतिगंभीर रुग्णांसाठी मशीनचा उपयोग करणे शक्य आहे.


- आ. नमिता मुंदडा, केज विधानसभा मतदार संघ

## सकल ओबीसी व बहुजन समाजाच्या वतीने गुरुवारी केज बंद !!




प्रकाश मुंडे / केज तालुका

सकल ओबीसी समाज व बहुजन समाजाच्या वतीने आज बीड लोकसभेच्या उमेदवर मा.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्यावर आक्षेपार्ह व अश्लील भाषेत व्हिडिओ व पोस्ट काही समाजकंटकाकडून पसरवण्यात येत आहेत.मा.पंकजाताई मुंडे या महिला असून बहुजन, ओबीसी, भटक्या विमुक्त, मागासवर्गीय व वंचित घटकांचे नेतृत्व करतात व त्या स्वतः त्या समाजाच्या असल्याने काही लोक त्यांच्यावर खालच्या पातळीवर आक्षेपार्ह पोस्ट, व्हिडिओ सोशल मीडियावर जाणिवपूर्वक पसरवत आहेत.त्यासंबंधी वारंवार केज पोलिस स्टेशनमध्ये तोंडी व लेखी तक्रार देण्यात आली आहे तरी संबंधितांवर कुठलिही कारवाई किंवा अटक झालेली नाही. अशा प्रवृत्तीच्या लोकांचा तात्काळ बंदोबस्त करुन कडक कारवाई करावी यासाठी गुरुवार दिनांक १३.०६.२०२४ रोजी केज शहर बंद ठेवण्यात येणार आहे . याचे लेखी निवेदन केज तहसील येथे नायब तहसीलदार वाघ मॅडम व केज पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांना देण्यात आले आहे. यावेळी सकल ओबीसी समाज व बहुजन समाजातील तसेच मागासवर्गीय समाजातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




घाटा पिंपरी परिसरात वादळी वारे सह पाऊस झाल्याने शेतकरी राजा समाधान झाला असून काही शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे छायाचित्र सुरेश कांबळे

# वेल्डिंग, मशिनरी आल्या अन् सुतार नेटावरील गप्पा बंद झाल्या!

## सुतार व्यवसाय होऊ लागला कालबाह्य

आष्टी ।प्रतिनीधी

पुर्वीच्या काळी गावोगाव सुतार व्यवसाय तेजीत असायचा,याच सुतार नेटावर गावगाड्याच्या गप्पा रंगायच्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत चांगली गर्दी असायची.पण आता काळा बदलत गेला आणि आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाल्याने सुतार व्यवसाय कालबाह्य होऊ लागल्याचे चित्र ग्रामीण भागातील गावोगाव दिसुन येत आहे.

सुतार कुटुंबियाचे संपूर्ण जीवन त्याच्या कलाकौशल्यातुन लाकूड आणल्यावर त्याला तासायचे , करवतीने कापायचे , पटाशी वापरून, रंधा वापरून गुळगुळीत करून विविध लाकडी वस्तूच्या मिळीतीतून घडविले जात असे. शेतीसाठी लागणारे लाकूड आणल्यावर त्याला तासायचे , करवतीने कापायचे , पटाशी वापरून, रंधा वापरून गुळगुळीत करून त्यापासून नांगर,फण,गाडी,ज्यू, तिफण, रूमणे,आदि अवजारे तर घरगुंती साहित्यांत पलंग,टेबल,खुर्ची,पाट, पाटं , स्टूल , चौरंग , घरातली छोटी देवळं , दाराच्या चौकटी, खिडकीच्या चौकटी,शेती अवजारे इत्यादी तयार करण्याचे काम सुतार करत असतं . लाकडी खेळणी तयार करायचे , बंगया तयार करायचे, बारशासाठी पाळणे तयार करायचे, लाकडाचे छोटे नंदी तयार करायचे अशी कामे सुतार आपल्या गावोगाव असलेल्या सुतार नेटावर करायचे.पण काळ बदलला आणि पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाल्याने सुतार नेटावर घरगुंती साहित्य बनविण्यासाठी शेतकरी सूताराकडे जाऊन तासनतास बसत. पण आता होणारी गर्दी शेतीचे अवजार बनवण्याकडे कल कमी झाला आणि हा व्यवसाय आता कालबाह्य होऊ लागला आहे.

शेतीसाठी महत्वाचा मानला गेलेला सुतार व्यवसाय आता पहिल्या सारखा राहिला नाही.गावोगाव वेल्डिंग, मशिनरी आल्या आणि सुतार व्यवसाय कमी झाला.आज बोटावर मोजता येईल एवढ्याच ठिकाणी सुतार वेल्डिंग, मशिनरी आल्या अन् सुतार नेटावरील गप्पा बंद झाल्या! सुतार व्यवसाय होऊ लागला कालबाह्य आष्टी प्रतिनिधी. पुर्वीच्या काळी गावोगाव सुतार व्यवसाय तेजीत असायचा,याच सुतार नेटावर गावगाड्याच्या गप्पा रंगायच्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत चांगली गर्दी असायची.पण आता काळा बदलत गेला आणि आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाल्याने सुतार व्यवसाय कालबाह्य होऊ लागल्याचे चित्र ग्रामीण भागातील गावोगाव दिसुन येत आहे.

सुतार कुटुंबियाचे संपूर्ण जीवन त्याच्या कलाकौशल्यातुन लाकूड आणल्यावर त्याला तासायचे , करवतीने कापायचे , पटाशी वापरून, रंधा वापरून गुळगुळीत करून विविध लाकडी वस्तूच्या मिळीतीतून घडविले जात असे. शेतीसाठी लागणारे लाकूड आणल्यावर त्याला तासायचे , करवतीने कापायचे , पटाशी वापरून, रंधा वापरून गुळगुळीत करून त्यापासून नांगर,फण,गाडी,ज्यू, तिफण, रूमणे,आदि अवजारे तर घरगुंती साहित्यांत पलंग,टेबल,खुर्ची,पाट, पाटं , स्टूल , चौरंग , घरातली छोटी देवळं , दाराच्या चौकटी, खिडकीच्या चौकटी,शेती अवजारे इत्यादी तयार करण्याचे काम सुतार करत असतं . लाकडी खेळणी तयार करायचे , बंगया तयार करायचे, बारशासाठी पाळणे तयार करायचे, लाकडाचे छोटे नंदी तयार करायचे अशी कामे सुतार आपल्या गावोगाव असलेल्या सुतार नेटावर करायचे.पण काळ बदलला आणि पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाल्याने सुतार नेटावर घरगुंती साहित्य बनविण्यासाठी शेतकरी सूताराकडे जाऊन तासनतास बसत. पण आता होणारी गर्दी शेतीचे अवजार बनवण्याकडे कल कमी झाला आणि हा व्यवसाय आता कालबाह्य होऊ लागला आहे.

शेतीसाठी महत्वाचा मानला गेलेला सुतार व्यवसाय आता पहिल्या सारखा राहिला नाही.गावोगाव वेल्डिंग, मशिनरी आल्या आणि सुतार व्यवसाय कमी झाला.आज बोटावर मोजता येईल एवढ्याच ठिकाणी सुतार व्यवसाय शिल्लक आहे.पण कालांतराने हा व्यवसाय पुर्णपणे कालबाह्य होणार आहे.सूतार व्यवसाय बंद झाल्याने मोलमजूरी करूनच पोट प्रपंच चालववा लागत असल्याचे पिंपरीघाटा येथील सूतार व्यवसायिक संतोष जवणे यांनी सांगितले. पोट प्रपंच चालववा लागत असल्याचे पिंपरीघाटा येथील सूतार व्यवसायिक संतोष जवणे यांनी सांगितले.



मोमीन पुरा कुरेशी मोहल्ला येथील सय्यद रजीयोद्दिन शहा मक्की दर्गाह शरीफ परिसर आणि नाला प्रचंड घानी मुळे तुंबला होता,मुस्लिम धर्मीयांचा पवित्र बकरिद सण जवळ आला आहे या मुळे हा परिसर स्वच्छ करून देणे गरजेचे होते तश्या तक्रारी वारंवार येत होत्या यामुळे या मोठ्या परिसरात आणि नाल्यात महा स्वच्छता करून घेत या ठिकानची पंचवीस ते तीस ट्रॅक्टर घाण नगरपालिकेच्या कर्मचारी यांच्या मदतीने जेसीबी द्वारे काढून पूर्ण परिसर चकाचक करून घेतला आदरणीय जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वखाली हा जनसेवेचा यज्ञ असाच सुरू राहणार आहे आपलाच वाजेद जावेद कुरेशी

### दोन दिवसात मनोज जरांगे यांच्या उपोषणाची दखल न घेतल्यास

# वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन : सकल मराठा समाज वडवणी

वडवणी ।प्रतिनीधी

सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करुन मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गेली ६ दिवस झाले कसल्याही प्रकारचे अन्न पाणी न घेता अंतरवली सराटी येथे उपोषणास बसले आहेत.त्यांच्या आंदोलनाची कसल्याही प्रकारे दखल न घेता सरकार हे बघ्याची भूमिका घेत आहे.जरांगे पाटील यांची तब्येत दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.मराठा समाज पाटलांची हाल अपेष्टा कदापिही सहन करू शकत नाही.

येत्या दोन दिवसांमध्ये जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.सविस्तर वृत्त असे की



गेली दहा महिने झालं मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गोरगरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन करत आहे.अंतरवली सराटी ते मुंबई पाई महामोर्चा काडला होता.या मोर्चाची धास्ती घेऊन मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सग्या सोयऱ्यांची अधिसूचना काढली पण त्याला पाच महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी केली नाही.अंतरवली सराटी येथील व महाराष्ट्रातील विनाकारण कारण नसतांनाही मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल केले ते अद्यापही मागे घेतले नाहीत.सरकारने या समाजाच्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गेले आठ जून पासून आन्न पाणी न घेता कठोर उपोषणाला बसले आहेत.त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली आहे.त्यांच्या आंदोलनाची कसल्याही प्रकारे सरकार दखल घेत नाही.या आंदोलनाकडे सरकार नुसती बघ्याची भूमिका घेत आहे.परंतु सकल मराठा समाजाला पाटलांची ही हाल अपेस्टा सहन होऊ शकत नाही.येत्या दोन दिवसांमध्ये त्रिमूर्ती सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सकला मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीनेदेण्यात आला आहे.

# त्या लाच खोर अधिकाऱ्यावर कारवाई कधी होणार ? कारवाईचे आदेश आरध्या तासात का झाले रद्द

### माजलगाव चा अभय महिला व बाल विलास संरक्षण केंद्रात अनाथ मुलांना योजने चा लाभ मिळेल ना :-कपिल आडागळे

टाकरवन ।प्रतिनीधी

माजलगाव पंचायत समिती मधील महिला व बालविकास अभय केंद्र कार्यालयातील संरक्षण अधिकारी अनाथ मुलांच्या योजनेसाठी लाच मागत असल्याची तक्रार टाकरवन येथील कपिल आडगळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांच्याकडे केली होती.तक्रार देऊन महिना लोटला मात्र अध्याप त्या लाचखोरा अधिकाऱ्याची चौकशी झाली नाही. प्रस्ताव देऊन सहा मिहने लोटले तरीही अनाथ मुलांना योजनेचा लाभ भेटला नाही.सामान्यांना न्याय व योजनेचा लाभ मिळत नसल्याने बीड प्रशासनाचा कारभारावर शंका निर्मान होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकविकास विभाग मार्फत बाल संगोपन योजनेच्या माध्यमातून अनाथ मुलांच्या पालनपोषणासाठी महिन्याला आर्थिक मानधन दिले जाते.माजलगाव पंचायत समिती मधील अभय संरक्षण केंद्रात बाल संगोपन योजनेसाठी अर्ज करण्यास गेलेल्या नागरिकांना तेथील संरक्षण अधिकारी पैशाची मागणी करत असल्याने.टाकरवन येथील कपिल आडागळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांच्याकडे तक्रार करून लाचखोर अधिकाऱ्याचा कारभार चव्हाट्यावर आणला होता. मात्र तक्रार करून महिना लोटला तरी अद्यापही या अधिकाऱ्यावर कोनतीही कारवाई झाली नाही.तसेच सहा महिन्यापासून योजनेच्या लाभासाठी टाकरवन येथील कु.आकाश त्रिबंक आडागळे कु.वैष्णवी त्रिबंक आडागळे कु.शिवानी त्रिबंक आडागळे या अनाथ मुलांचा अर्ज देऊनही योजनेचा लाभ मिळाला नाही. वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालून लाचखोर अधिकाऱ्यावर कारवाई करावी व अनाथ मुलांना योजनेचा लाभ देऊन न्याय द्यावा अशी मागणी

### चौकशीचे आदेश आर्धा तासात रद्द का झाले

माजलगाव येथील अभय संरक्षण अधिकारी अनाथ मुलाच्या योजने साठी पैसे मागत असल्याने कपिल आडगळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांना लेखी तक्रार दिली होती.त्यानंतर मंगेश जाधव चौकशी समीती अध्यक्ष तथा परिविक्षा अधिकारी बीड यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत करून २१ मे रोजी चौकशीचे आदेश पत्र काढले होते व तक्रारदारास हजर राहण्यास कळवले होते.मात्र आदेश काढल्यानंतर अर्ध्या तासातच चौकशी रद्द झाल्याचा निरोप मंगेश जाधव यांनी फोन द्वारे तक्रार दारास दिला आसल्याची माहीत तक्रार दाराने दिली.चौकशीचे आदेश अर्ध्या तासात रद्द का करण्यात आले.लाचखोर अधिकाऱ्यावर कारवाई का होत नाही.चौकशीच्या आदेशाचा सावळा गोंधळ काय आहे याचे कारण समजत नसल्याने प्रशासनावरचा विश्वास उडाल्याची माहिती तक्रारदाराने दिली आहे.

### तक्रारदाराला धमक्या

माझा भावाचे मुले आनाथ आहेत योजनेचा लाभघेन्यासाठी सहा महिन्यापुर्वी आर्ज केलेला आहे.लाच मागितल्याने संतोष अंकुश डोंगरदिवे या अधिकाऱ्याची मि तक्रार केली.तक्रार का केली म्हणून मला वेगवेगळ्या लोकामार्फत तू माजलगाव ला ये तुझ्याकडे बघतो अशा धमक्या दिल्या जात असल्याने मि भयभीत झालो आहे.या अधिकाऱ्यामुळेच मला धमक्या येत आहेत.अशी प्रतिक्रिया तक्रादार कपिल आडागळे यांनी दिली आहे.येथील अधिकारी लाभार्थ्याकडुन दोन हजाराची मागणी करतो व रीतसर लेखी पुरावे देत नाही.या सर्व प्रकाराची चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी मि कपिल आडागळे करत आहे.



बीड येथील तय्यब खान पठाण यांच्या आईचा अपघात झाला होता परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी माजीमंत्री जयदत्त (अण्णा)क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या काकू नाना प्रतिष्ठान संचलित वैद्यकीय मदत कक्षाशी संपर्क करून मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी शिफारस केली.वैद्यकीय मदत कक्षातर्फे पाठपुरवठा करून त्यांना मदत मिळवून देण्यात आली.मंजूर झालेल्या मदतीचे पत्र माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते युनूस सय्यद,सिद्दिकी सादेक सर यांना देण्यात आले. त्याप्रसंगी सोबत डॉ. अरुण भस्मे,वैद्यकीय मदत कक्षाचे विजय देवमाने.

# सादोळा येथील ग्रामसेवकाची बदली करा

### गटविकास अधिका-याकडे निवेदन

**माजलगाव ।प्रतिनीधी तालुक्यातील सादोळा ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक ओम सिमबोलीकर हे सतत गैरहजर राहत असल्याने ग्रामपंचायतीची तसेच ग्रामस्थांची अनेक कामे खोळंबली आहेत. त्यामुळे सदर ग्रामसेवकाची बदली करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय सोळंके यांनी गटविकास अधिका-याकडे केली आहे.**

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सादोळा ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सिमबोलीकर हे सतत गैरहजर असुन फोन केल्यास फोन देखिल उचलत नाहीत. परिणामी ग्रामपंचायत कार्यालय तसेच गावातील विवीध लोकांचे विवीध कागदपत्रे व कामांवर परिणाम होत आहे. परिणामी ग्रामस्थांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर ग्रामसेवकाची बदली करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय सोळंके यांनी गटविकास अधिका-याकडे केली आहे.तालुक्यातील सादोळा ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक ओम सिमबोलीकर हे सतत गैरहजर राहत असल्याने ग्रामपंचायतीची तसेच ग्रामस्थांची अनेक कामे खोळंबली आहेत.

# सन २०२४-२५ व २०२५-२६ करिता फळ पीक विमा योजनेत संबंधित शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे - कृषिमंत्री धनंजय मुंडे

### मृग व आंबिया बहारातील फळांचा विमा भरण्यास सुरुवात, विहित मुदतीत शेतकरी बांधवांनी विमा भरून घेण्याचे आवाहन

मुंबई ।प्रतिनीधी

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षात राबवण्यासंदर्भात राज्य शासनाने मान्यता दिली असुन मृग बहार व आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांचा विमा शेतकऱ्यांनी भरून या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. या हंगामात राज्यात डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष, आंबा, पपई, काजू, स्ट्रॉबेरी व द्राक्ष क इत्यादी पिकांचा फळपीक विमा योजनेत सहभाग करण्यात आला आहे.



ही योजना भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलियांज, फ्युचर जनरल आणि युनिव्हर्सल सोम्पो या चार कंपन्यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे. मृग बहरात द्राक्ष क, संत्रा, पेरू, लिंबू या चार पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत २५ जून निश्चित करण्यात आली आहे; त्याचबरोबर मोसंबी चिकू ३० जून, डाळिंब १४ जुलै तर सीताफळ पिकासाठी ३१ जुलै ही मुदत देण्यात आली आहे. दरम्यान २०२४ ते २६ या दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या फळपिकविमा योजनेचे स्वरूप, विमा संरक्षित रक्कम यांसह सविस्तर माहिती कृषी विभागाकडून जारी करण्यात आली असून, फळ उत्पादक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत आपला विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.



# कारगिल रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वृक्षारोपण

अंबाजोगाई ।प्रतिनीधी

कारगिल युद्धाला २५ वर्षे पुर्ण झाल्याबद्दल परमवीर चक्र प्राप्त सेनानी विक्रम बात्रा यांच्या स्मृती प्रित्यर्थ स्वा.रा.ति.महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले

यावेळी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर, सहसचिव भीमाशंकर शेटे,संचालक एल.जी. वैद्य, ड. कल्याणी विर्धे,प्रा.शैलजा बरुरे,पी.सी.गादेकर, एस.पी.कुलकर्णी,गणेश कदम, हेमंत धानोरकर, दत्ता बनसोडे आदी उपस्थित होते. तरुणांना स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास समजावा म्हणून त्यांच्या आठवणी वृक्षारोपणाच्या माध्यमातून जपण्याचा प्रयत्न ग्रीन आर्मीच्या वतीने करण्यात येत असल्याचे चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

## गोरख काळे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करा आशे आवाहन – मच्छिंद्र काळे



बीड / प्रतिनिधी : मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते गोरख काळे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करावा असे आवाहन मच्छिंद्र काळे यांनी केले आहे.सामाजिक कार्यकर्ते तथा मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांचा वाढदिवस दि. १५ जून रोजी असून या वाढदिवसाच्या निमित्ताने हितचिंतकांनी अवास्तव पैशाची उधळपट्टी करण्यापेक्षा हा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करावा यामध्ये रक्तदान शिबिर, रुग्णांना फळे वाटप, गरिबांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे विविध उपक्रम राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करावा असे आवाहन मच्छिंद्र काळे यांनी केले आहे.



**पोलीस अधीक्षकांना निवेदन...**

**भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा निसटता पराभव झाला. पराभवा मुळे चार युवकांनी आत्महत्या केली. अशा गंभीर परिस्थितीत सुध्दा पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात बदनामीकारक पोस्ट सोशल मीडिया द्वारे व्हायरल केल्या जात आहेत. अत्यंत गंभीर व दुर्दैवी बाब लक्षात घेऊन बहुजन सकल समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक बीड यांना कारवाई करणे बाबत निवेदन देण्यात आले.**

# धारूर तहसील कार्यालयवर निषेध मोर्चा

धारूर ।प्रतिनीधी

सकल ओबीसी, एस.सी., एस.टी., समाज बांधव,धारुर तालुका दि. १४-०६-२०२४ शुक्रवार सकाळी १०.०० वा. पाय मोर्चा मार्ग क्रांती चौक डॉ. बाबासाहेब आबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, काशीनाथ चौक या मार्गाने तहसील कार्यालय धारूर लोकनेत्या आदरणीय पंकजाताई गोपीनाथराव मुंडे व पालकमंत्री मा.ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या बद्दल आक्षेपार्ह पोस्ट, कमेंट केलेल्या लोकांवर




कडक कारवाई करा-कृतीच्या निषेधार्थ आरोपीवर कठोर कार्यवाहीच्या मागणीसाठी हे निवेदन देण्यात येत आहे दिनांक १४/०६/२०२४ रोजी धारुर तालुका सकल ओबीसी समाजाच्या वतीने धारूर कार्यालयावर मोर्चा काढून निषेध करण्यात येणार आहे तरी सर्व ओबीसी समाजाला उपस्थित राहून मोर्चा ला पाठिंबा देण्यासाठी ओबीसी समाज एकत्र घेऊन पोस्ट कमेंट केलेल्या लोकांवर कडक कारवाई करावी अशी मागणी साठी ओबीसी समाज मोर्चा करण्यात येणार आहे?

# गोविंदवाडीच्या पालख्या डोंगरावरील खंडोबा मंदिर परिसरातील पवनचक्की हटवा!

## भाविकांसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील गोविंदवाडी परिसरातील पालख्या डोंगरावर असलेल्या पनामा कंपनीच्या पवन ऊर्जा प्रकल्पातील एक पवन सखी अचानक पडल्याची घटना मागील गुरुवारी रोजी घडली होती. सुदैवाने मोठी घटना टळली यामध्ये कुठलेही जिवितहानी नाही. यावेळी मंदिर परिसरात व शेतात कोणी नसल्याने मनुष्यहानी झाली नाही. या भीतीमुळे ऊर्जा प्रकल्पाचे ऑडिट करून मंदिराजवळ असलेली पवनचक्की काढून टाकण्याची मागणी भाविकांसह या भागातील नागरिकांनी केली आहे.

गोविंदवाडी जवळील पालख्या डोंगरावर विविध कंपनीचा ऊर्जा प्रकल्प गत पंधरा वर्षांपासून सुरू आहे. प्रकल्प होण्याआधी मातीमोल भावात त येथील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करून हा प्रकल्प येथे उभा करण्यात आला. रीतसर परवानगी घेण्यात आली असली तरी अनेक गंभीर चुका दिसून येतात. डोंगरावर जवळपास १०० पवनचक्की



उभ्या आहेत. त्याचे वार्षिक ऑडिट होत नाही. त्यांना कोणी नियम विचारत नाही. यातच गुरुवारी प्रकल्पाची पोचकी अचानक पडल्याने कंपनीचे मोठी नुकसान झाल्याची माहिती संबंधित कर्मचाऱ्यांनी दिली मात्र सुदैवाने जीवितहानी झाली नाही. त्यामुळे या पवन ऊर्जा प्रकल्पाचे ऑडिट करून खंडोबा मंदिर परिसरातील पवनचक्की काढून टाकण्याची मागणी भक्तांनी व या भागातील नागरिकांनी केली आहे.

# आरडीएसएस योजनेअंतर्गत केज मतदारसंघासाठी ८० कोटींचा मिळाला निधी-आ. नमिता मुंदडा

अंबाजोगाई ।प्रतिनीधी

आरडीएसएस या योजनेअंतर्गत केज मतदारसंघास ८० कोटी रू.मंजूर झाले असून यामध्ये केज मतदारसंघातील गावठाण फिडर सेपरेट करण्यात येणार आहेत अशी माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली. या संदर्भात अधिक विस्ताराने बोलतांना त्यांनी सांगितले की, केज विधानसभा मतदारसंघातील २५ केव्हीए व १५ केव्हीए ट्रान्सफॉर्मर चा जागी १०० केव्ही ट्रान्सफॉर्मर गावठाण करिता



बसविण्याचे कामे युद्धपातळीवर सुरू आहे. ज्या ठिकाणी लिंक लाईन अवश्यक आहे त्याठिकाणी लिंक लाईन टाकण्याचे काम सुरू असून जुने ३३ केव्ही व ११ केव्ही तारा दुरुस्त करण्यात येत आहेत. तसेच ११ केव्ही चे खराब पोल दुरुस्त करण्यात येत आहेत. या सर्व कामामुळे गावातील २५ केव्हीए व १५ केव्हीए च्या ठिकाणी बऱ्याच ठिकाणी १०० केव्हीए ट्रान्सफार्मर बसवण्यात येत असल्यामुळे गटु जळणे व लवकर उपलब्ध न होणे याची कटकट कायमची बंद होणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांची वीजेची गरज लक्षात घेऊन केज विधानसभा मतदारसंघातील ही कामे सुरू आहेत असे ही त्यांनी सांगितले. केज मतदारसंघाकरिता ग्रामीण भागातील विद्युत पुरवठ्याकरिता ८० कोटी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्र सरकार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार, पंकजाताई मुंडे, खा. डॉ. प्रितम मुंडे यांचे आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी आभार व्यक्त केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केज विधानसभा मतदार संघांसाठी ८० कोटी ची निधी मंजूर करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले असल्याचे ही त्यांनी सांगितले. ही सर्व कामे वेगाने सुरु केली आहेत अशी माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली आहे.

# केज उपजिल्हा रुग्णालयाचा प्रताप ईमेल ठेवला दाबून

## लायक असून ही अनेक परिचारिका पुरस्कारा पासुन वंचित

केज ।प्रतिनीधी

सविस्तर माहिती अशी की फ्लोरेन्स नाईटिंगल पुरस्कार याची जाहीर होण्या आगोदर सर्व रूगणालयात ईमेल पाठवला जातो.त्यात सविस्तर उल्लेख आसतो ज्या परिचारीकांना हा पुरस्कारप्राप्ती साठी इच्छुक आहेत त्यांनी एक फॉर्म भरून द्याचा असतो.त्यात त्यांनी एक नियमावली आखून दिलेली असते.त्या निकषानुसार कामे केलेली असावेत असा नियम आहे. वर्षभरात कोण कोणते आरोग्य सेवा अंतर्गत कामे केली, रूग्ण सेवा कशी दिली,लसीकरण,प्रसुती,कॉपर टी बसवण्यास प्रवर्त करणे,इमर्जन्सी सेवा,गोपिनीय अहवाल अशे वेगवगळे नियमानुसार फॉर्म भरून तो मेट्रन व वैद्यकीय अधीक्षकाच्या शिफारसी नंतर तो जिल्हा परिषद अरोग्य विभागात पाठवला जातो त्यांनतर त्यांची पुरस्कारा साठी निवड होते.या साठी प्रत्येक रुग्णालयात जिल्हा रुग्णालयातून कर्मचाऱ्यांच्या माहिती साठी ईमेल केला



जातो, ईमेल पाठवण्याचा उद्देश हा की आपल्या रूगणालयात कर्मचाऱ्यांनी पुरस्कार निवडीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा व प्रत्येकानी आपली माहिती कळवावी पण हाच ईमेल केज उपजिल्हा रुग्णालयातील काहीनी दाबून ठेवला.रूगणालयानी हा ईमेल किंवा असा ईमेल आला हे कर्मचारीवर्गाला सांगीतल पाहिजे व्हॉट्सअप ग्रुप वर टाकायला पाहिजे पण अस न करता तो ईमेल दाबून ठेवला व कोणाला कळू न देता फक्त पुरस्कार प्राप्त झालेल्या परिचारीकांनाच सांगीतला व त्यांचेच फॉर्म जातील

# आत्महत्याग्रस्त तरुणांच्या कुटुंबीयांना गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देणार मदतीचा हात

## जीव देऊन भागणार नाही बाळांनो.. माझी शपथ आहे तुम्हाला, स्वतःच्या जीवाचं बरंवाईट करून घेवू नका – पंकजाताई मुंडे यांची हळहळ

बीड ।प्रतिनीधी

लोकसभेत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्महत्या केल्याच्या प्रकाराबद्दल भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी गंभीर चिंता व्यक्त करून हळहळ व्यक्त केली आहे. मी हात जोडून तुम्हाला विनंती करते, असा जीव देवून भागणार नाही बाळांनो..माझी शपथ आहे तुम्हाला स्वतःच्या जीवाचं काहीही बरं वाईट करून घेऊ नका असं आवाहन पुन्हा एकदा त्यांनी केलं आहे. दरम्यान आत्महत्या केलेल्या तरूणांच्या मुला बाळांचं पालनपोषण करण्याची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली असून लवकरच त्यांना मदत दिली जाणार आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणूकीत पंकजाताई मुंडे यांचा अगदी थोडया मतांनी पराभव झाला पण हा पराभव सहन न झाल्याने काही ठिकाणी तरूणांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या. मन सुन्न करणाऱ्या या घटनांनी पंकजाताई मुंडे यांनी तरूणांच्या कुटुंबीयांशी तात्काळ दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांच्या प्रती संवेदना व्यक्त केल्या. घरातील तरूणांनी आत्महत्या केल्याने त्यांच्या कुटुंबीयांच्या पालनपोषणाची जबाबदारी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानने घेतली आहे, त्यांना प्रतिष्ठान मार्फत मदत दिली जाणार आहे.

पंकजाताई मुंडे यांनी एक व्हिडिओ शेअर करून तरूणांना आवाहन केलं आहे. त्या म्हणाल्या, काय बोलू, मी तुमच्या सगळ्यांशी हे कळत नाही. मी आवाहन केले, माझं आवाहन तुमच्या दुःखाच्या, नैराश्याच्या पलीकडे ते आवाहन पोहोचत नाही की काय, असं दिसत नाही. गेल्या काही दिवसांत ज्या तरुणांनी आत्महत्या केल्या, या घटनांनी मी जेवढी खचले तेवढं कदाचित कोणी कोणी खचलं नसेल. मी अहमदपूरमधल्या त्या तरुणाच्या आईशी बोलले, ती माऊली म्हणाली की, ताई तुम्ही टेन्शन घेऊ नका, त्याचा तुमच्यावर खूप जीव होता. इतकं प्रेम याला मला शब्द सापडत नाहीत. कदाचित तुम्ही माझ्यावर अघोरी प्रेम करताय. प्रत्येकक्षणी



एक-एक कर्ज माझ्यावर चढवत आहात.तुम्ही मला पाहिलंय, गेली २०-२२ वर्षात, मुंडे साहेबांसारख्या पहाडासारख्या नेत्याला मी भावनिक होताना पाहिलं आहे, मी त्यांना आधार दिला. मी त्यांना आधार देण्याइतकी मोठी नाही. पण मी आधार द्यायचा भाव आणला, कारण त्यांना वाटायला नको की,आपल्याला मुलगी आहे आणि ती खूप कोमल आहे. नाही बाबा, मी खूप कठीण आहे, कर्मठ आहे, मी तुमच्यासाठी लढायला मागे हटणार नाही. ४ जूनला मुंडेसाहेब गेले तो दिवस आठवा, दगडं पडत होती सगळ्यांच्या डोक्यावर, पण मी धावत जाऊन माईक हातात घेतला, जीवाची पर्वा केली नाही. कोणाचाही विचार केला नाही,विचार केला समाज चेंगरेल, अनेक जीव जातील, याचा केला. तेव्हा मी तुम्हाला मुंडे साहेबांची शपथ दिली, ती शपथ तुम्ही पाळली. आता जे काही झालं ते तुमच्या जीवाला लागलं आहे, पण तुम्ही असं जिव्हारी लावून घेणार असाल आणि अशा रस्त्यावर जाणार असाल तर, माझी शक्ती बनण्यापेक्षा असं पाऊल उचलणार असाल तर मला राजकीय पाऊल उचलताना मला प्रश्न पडतो.माझ्या राजकारणात स्वार्थ नाही, माझं आजपर्यंतचं राजकारण उद्देशाचं होतं, जेव्हा पद मिळालं तेव्हा गरिबांसाठी काम केलं, नाही मिळालं तेव्हा ती गोष्ट हसतखेळत झेलली. हे राजकारण आहे, राजकारणात अशी वेळ येत असते. आतापर्यंतच्या इतिहासात थेटपणे एखाद्या व्यक्तीला, वर्णाला हीन लेखून प्रचार झाला नाही, ते तुमच्या जिव्हारी लागलं आहे, हे मला माहिती आहे. आपल्याला वंचितांचा आवाज बनायचं आहे, आपल्याला त्या सगळ्यांना ताकदी देणारी फौज बनायचं आहे. असं जीव देऊन भागणार नाही रे बाळांनो, मग मी कसं काम करु, मी तुम्हाला हात जोडून विनंती करते, मी तुमच्याकडे यायलेय, पण माझा पायच उचलत नाही, सांत्वनासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. मी येत आहे. कृपा करुन माझी शपथ आहे तुम्हाला, मी साहेबांची शपथ घालून पाहिली

# नीट परीक्षेत शिव शारदा पब्लिक स्कूलच्या चि.रणवीर आहेर ची जिल्ह्यात गगनभरारी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील सर्वोत्कृष्ट इंग्रजी ( सीबीएसई ) माध्यमाच्या शिव शारदा पब्लिक स्कूलमध्ये नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी तसेच २०२३-२४ च्या दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते प्रीथ्वीराज पंडित होते तर अध्यक्षस्थानी शाळेचे कर्तव्यदक्ष प्राचार्य कॅप्टन दास पिल्लई उपस्थित होते.प्रथमतः प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वतीचे पूजन करण्यात आले. मेडिकल प्रवेशपूर्व परीक्षा नीट मध्ये प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. आहेर रणवीर बप्पासाहेब याने नीट परीक्षेत बीड जिल्ह्यात सर्वाधिक ७२० पैकी ७१० गुण मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे तसेच कु.वाघ आदित्य बाळासाहेब ७२० पैकी ६७० गुण, कु. पंडित सार्थक बापूसाहेब ७२० पैकी ६६० गुण, कु.धुमक कृष्णा काकासाहेब ७२० पैकी ६४० गुण तर कु. पारीख सागर संतोष ७२० पैकी ५८० गुण घेण्यामध्ये समावेश असून; त्यांचा




प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दहावी वर्गाचे शिक्षक यांनाही पेढे भरून पुष्प गुच्छ देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी नीट व दहावीचे विद्यार्थी पालकांसह उपस्थित होते. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच यावर्षी शाळेत नवीन आलेल्या विद्यार्थ्यांचे चॉकलेट व पुष्प देवून त्यांचेही शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. शिवाजीराव ( दादा ) पंडित, अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, माजी जि. प. अध्यक्ष विजयसिंह पंडित, युवा नेते प्रीथ्वीराज पंडित, क्रीडा प्रेमी रणवीर ( काका ) पंडित यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. करांडे समृध्दी व कु. वाधवानी जिगिशा यांनी केले तर आभार कु. दातखीळ आदिती हिने मानले.

## मा.जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्तित रहा – सागर धन्वे

**नाळवंडी । प्रतिनिधी**

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकी नंतर पाठोपाठ आता विधानसभेच्या निवडणुका लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे,आता प्रत्येक जिल्ह्यात नेते आमदारकीसाठी लढताना दिसत आहेत,कोण होणार आमदार हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत आहे.त्यांच निवडणुकीच्या अनुषंगाने माझी.मंत्री.जयदत्त क्षीरसागर यांनी दि.१६/०६/२०२४ रविवार रोजी बिड शहरामध्ये भव्य मेळाव्याचे आयोजन केले आहे,या मेळाव्याला असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत,,**

हा मेळावा जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पार पडणार आहे,संपूर्ण तालुक्याचे लक्ष या मेळाव्या कडे लागलेलं आहे,,जयदत्त क्षीरसागर हे कोणत्या पक्षात जाण्याची भूमिका घेतात हे आता महत्वपूर्ण ठरणार आहे..जयदत्त



क्षीरसागर ज्या पक्षात असतील त्या पक्षाला नक्कीच फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे,त्याच अनुषंगाने या होणाऱ्या मेळाव्याला मोठ्या संख्येने बिडकरानी उपस्थित राहावे असे आव्हान जयदत्त आण्णा क्षीरसागर युवा मंच्याचे पेठ बीडचे युवा नेते शुभम धन्वे आणि सागर धन्वे यांनी केले आहे.


# उद्या पासुन श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये अवतरणार पंढरी

## संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवास उद्या पासुन सुरुवात

बीड ।प्रतिनीधी

**विसाव्या शतकातील एक महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोविसाव्या पुण्यतिथी निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात ज्येष्ठ शु. ८ , शुक्रवार दि. १४/०६/२०२४ रोजी होणार आहे आणि सांगता जेष्ठ शु. १४ वटपोर्णिमा , शुक्रवार दि. २१/०६/२०२४ रोजी होणार आहेत. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र चाकरवाडी येथे प्रतिवर्षी सद्गुरू संत वै. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ विविध कार्यक्रम पार पडतात. यंदाही ग्रामस्थ व संस्थानच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

या अखंड हरिनाम सप्ताहास उद्या पासुन १४ -०६-२०२४ पासुन सुरुवात होणार आहे आणि २१-०६-२०२४ रोजी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा भजन,६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम , ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते दुपारी १ गाथा भजन पार पडेल. दुपारी २ ते ५ संगीतमय श्रीराम कथा , ५ ते ६ सायंकाळी हरिपाठ, ६ ते ८ अभंग वाणी संगीत भजनाचे आठ दिवस कार्यक्रम होणार आहेत. ८.३० ते १०.३० हरिकीर्तन व त्यानंतर रात्री हरीजागर व भारुड असे कार्यक्रमही होतील. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये श्रीराम कथा प्रवक्ते श्री संत ज्ञानेश्वर माऊली दादा कृपांकित रामायणाचार्य श्री ह भ प समाधान महाराज शर्मा श्री शेत्र केज यांची श्रीराम कथा होणार आहे. तसेच श्री नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र ताडबोरगाव जिल्हा परभणी यांचा दररोज हरिपाठ होणार आहे. सप्ताहाची सुरुवात मंगल कलश स्थापना, दीपप्रज्वलन, ग्रंथ पूजन, टाळ, मृदंग, विना श्रुतीपूजन, ध्वजारोहण मठाधिपती महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकट स्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर यांच्या शुभहस्ते पूजाविधी सोहळा संपन्न होऊन या महोत्सवास आरंभ होईल. व्यासपीठ भूषण मृदंग महामेरू श्री ह भ प रामबुवा



महाराज काजळे श्री क्षेत्र ताडबोरगाव जि. परभणी यांची पारायण सेवेची सेवा दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेमध्ये होणार आहे. सप्ताहाच्या प्रारंभी श्री बंकट स्वामी मठसंस्थानचे मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे कीर्तन होईल. त्यानंतर संत पिठाचार्य तथा अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले, धर्मगुरू श्री ह भ प अमृताश्रम स्वामी महाराज जोशी श्री क्षेत्र नवगण राजुरी, प्रेम मूर्ती मठाधिपती महंत श्री ह भ प शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायण गड, व्याकरणाचार्य श्री ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र होळ, भागवताचार्य श्री ह भ प पद्माकर महाराज देशमुख अमरावती, ज्ञानसिंधू श्री ह भ प संदिपान महाराज शिंदे हासेगावकर अध्यक्ष श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र आळंदी देवाची, तसेच काल्याचे किर्तन वारकरी संप्रदाय भूषण रामायणाचार्य श्री ह भ प रामरावजी महाराज ढोक नागपूरकर यांचे संपन्न होईल. त्यानंतर महाप्रसादिक महापंगती होतील.

होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री. ह .भ.प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांनी केले आहे. तरी भाविकांनी हरिनाम श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा ही विनंती / आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी चाकरवाडी आणि तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री. ह.भ.प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांनी केले आहे. सर्व कार्यक्रम सद्गुरु संत श्री माऊली महाराज समाधी मंदिर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे पार पडणार आहेत. या सोहळ्यात महाराष्ट्रातील दिग्गज गायनाचार्य व मृदंगाचार्य यांची सेवा लाभणार आहे. या आध्यात्मिक ज्ञानसागराचा लाभ पंचक्रोशीतील आणि महाराष्ट्रातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली..

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी श्री क्षेत्र चाकरवाडी येथील ग्रामस्थ व ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या वतीने माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २४ व्या पुण्यतिथी सोहळ्याची जय्यत तयारी केली आहे. या नामसोहळ्या स्वयंस्फूर्तीने सेवा समर्पित स्वयंसेवक तथा समस्त गावकरी मंडळी सुद्धा उपस्थित राहणार आहेत. भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी विशेष व्यवस्थाही केली आहे. उत्सव काळात जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने भाविक हजर राहतील, नेकनुर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



## राजमुद्रा देऊन संभाजी ब्रिगेड ने केले खासदार बजरंग सोनवणे यांचे अभिनंदन

माजलगाव ।प्रतिनीधी

संभाजी ब्रिगेड शिवसेना युती धर्मातून महविकास आघाडी चे उमेदवार शरदचंद्र पवार गटाचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचार यंत्रणा मधे अहोरात्र वेळ संभाजी ब्रिगेड ने दिला, गाव खेड्यात संभाजी ब्रिगेड च्या शाखा असून संभाजी ब्रिगेड ने गाव खेड्यात प्रचार करून जमेल ते सहकार्य बजरंग बप्पा निवडून यावेत या साठी केले. संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष विजय दराडे यांनी निवडणुकी पूर्वी दिलेला शब्द खरा ठरला आज बजरंग सोनवणे बीड खासदार यांचा सत्कार संभाजी ब्रिगेड कडून करण्यात आला, बजरंग सोनवणे यांनी सर्वांचे आभार मानले. उपस्थित संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष विजय दराडे,किल्ले धारूर तालुका अध्यक्ष रमेश मोरे,जिल्हा सचिव अण्णासाहेब सोळंके,माजलगाव शहर प्रमुख परमेश्वर अडागळे,गणेश पाटेकर,रवी पवार सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

# ॲट्रॉसिटी प्रकरणातील आरोपीं मोकाट, उलट पोलिसांनी बौद्ध समाजावरच दाखल केले दरोड्याचे गुन्हे

## खोटे गुन्हे रद्द करा अन्यथा समाजाचा आंदोलनाचा इशारा

परळी ।प्रतिनीधी

परळी पासून जवळच असलेल्या मौजे दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण झाल्याची घटना पंधरा दिवसापूर्वी घडली होती. याप्रकरणी आरोपीविरुद्ध अट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. परंतु पोलिसांनी आरोपीशी संगणमत करून उलट बौद्ध समाजातील तरुणावरच आणि सामाजिक कार्य करणाऱ्या शिक्षकावर खोटे ३९५ यासारखे दरोड्याचे व इतर गुन्हे दाखल केल्याने बौद्ध समाजात संतापाची लाट उसळली आहे. सदर खोटे गुन्हे रद्द करावे अन्यथा पोलिसांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बौद्ध संघर्ष समिती, वंचित बहुजन आघाडी व इतर आंबेडकरवादी पक्ष आणि संघटनांनी दिला आहे. तर गेले दोन दिवसापासून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या महिला व पुरुष उपविभागीय कार्यालयासमोर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मागण्यासाठी उपोषणाला बसलेल्या आहेत.





याबाबत अधिक माहिती अशी की परळी तालुक्यातील दाऊतपूर येथे दिनांक २४ मे रोजी बौद्ध तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी आकाश अश्रुबा मुंडे यांच्या फिर्यादीवरून त्यावेळी मारुती उत्तम काचगुंडे, ज्ञानदेव बाबुराव काचगुंडे ,खंडू उत्तम काचगुंडे, वैजनाथ बाबुराव काचगुंडे यांच्या विरोधात ट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपींना परळी ग्रामीण पोलिसांनी अद्याप पर्यंत अटक केलेले नाही. यातील मारूती उत्तम काचगुंडे यांच्यावर ३०२ सारखा गंभीर गुन्हा असल्याचे समजते ही गंभीर बाब आहे. त्याला पोलिसांचा अभय आहे की काय असा संशय निर्माण होत आहे. दरम्यान आरोपींशी संगणमत करून उलट दिनांक ९ जून रोजी मारहाण झालेल्या बौद्ध युवकावरच परळी ग्रामीण पोलिसांनी ज्ञानेश्वर बाबुराव काचगुंडे यांच्या फिर्यादीवरून कलम ३९५, ३४१, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी न्याय मिळावा म्हणून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या अनुसया भालेराव, सुमित सुरवसे ,आशाबाई सुरवसे, सुनीता मुंडे, मंदाबाई मुंडे, बाबुराव मुंडे, लंकाबाई मुंडे, पूजा मुंडे, शंकर मुंडे आदी बौद्ध समाजाचे महिला, पुरुष गेल्या दोन दिवसापासून परळी उपविभागीय कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. तसेच दाखल करण्यात आलेले खोटे ३९५ चे गुंन्हे मागे घेण्यात यावेत, ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी व दाऊतपूर येथील बौद्ध समाजाला पोलीस संरक्षण द्यावे आदी प्रमुख मागण्यासह उपोषणाला बसले आहेत .

दरम्यान या प्रकरणी दाऊतपूर ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा, दाखल करण्यात आलेले ३९५ व इतर बहुजन समाजावरील गुन्हे रद्द करावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एका निवेदनाद्वारे या बौद्धजन संघर्ष समिती,व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परळी उपविभागीय अधिकारी तसेच परळी तहसीलदारांन देण्यात आले आहे.

# वृत्तपत्रांना दर्शनी जाहिरात देताना दैनिके साप्ताहिके असा भेदभाव करु नका- कुलकर्णी

माजलगाव ।प्रतिनीधी

शासन मान्य जाहिरात यादी वरील वृत्तपत्रांना दर्शनी जाहिरात देताना दैनिके व साप्ताहिके असा कोणताही भेदभाव शासनाने करू नये अशी विनंती एका निवेदनाद्वारे असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी केली आहे. राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांच्यासह राज्यातील संघटनेच्या सर्व पदाधिकारी व राज्यातील अनेक मान्यवर संपादकांनी राज्य शासनाचे या प्रश्नी लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसापासून निवेदन अभियान राबविले होते. या निवेदन अभियानास चांगला प्रतिसाद मिळाला असून राज्य शासनाने याची गंभीर दखल घेऊन दर्शनी जाहिराती देताना साप्ताहिकांचा देखील विचार केला पाहिजे अशी मागणी या निमित्ताने करण्यात आली आहे.



नुकतेच राज्य शासनाच्या वतीने एक परिपत्रक काढण्यात आले असून या परिपत्रका मध्ये मराठा समाजाच्या विकासासाठी आणि मराठा समाजासाठी शासनाने राबविलेले विविध उपक्रम आणि योजना याची माहिती देण्यासाठी जाहिराती दिल्या जाणार आहेत. जाहिराती वितरित करताना फक्त त्या दैनिकांनाच वितरित करण्यात याव्यात असे सदर परिपत्रकामध्ये आर्थिक तरतूद करताना म्हटले आहे साप्ताहिकांच्या बाबतीत कोणतीही आर्थिक तरतूद सदर परिपत्रका मध्ये करण्यात आलेली नाही. यामुळे साप्ताहिकांच्या संपादकात तीव्र नाराजी पसरली आहे. राज्य शासनाच्या विविध योजना आणि माहिती साप्ताहिके हे आपल्या वृत्तपत्रात नेहमीच अग्रक्रमाने प्रकाशित करतात आणि जशीच्या तशी माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम साप्ताहिके प्रामाणिकपणे करत असताना देखील साप्ताहिका कडे पाहण्याचा दृष्टिकोन शासनाचा चुकीचा बनला आहे, हा दृष्टिकोन शासनाने बदलून साप्ताहिकांना जाहिराती देताना कोणताही भेदभाव करू नये . दैनिकांना ज्याप्रमाणे जाहिराती दिल्या जातात त्या प्रमाणात साप्ताहिकांचाही विचार राज्य शासनाने केला पाहिजे असे सदर निवेदनात म्हटले आहे

राज्याच्या सर्व भागातून याप्रमाणे प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी व मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले असून राज्य शासन या प्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनमान्य जाहिरात यादी वरील साप्ताहिक वृत्तपत्रांना विशेष प्रसिद्धी मोहिमेच्या जाहिराती प्राधान्याने देईल अशी अपेक्षा यावेळी राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी व्यक्त केली आहे.




**बीड – साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे अनुकंप तत्वावर मुलाला घ्या या मागणीसाठी सामाजिक न्याय भवन बीड समोर तिसऱ्या दिवशीही आमरण उपोषण सुरू उपोषणकर्त्या सुनीता गीत्ते यांची प्रकृती खालावली प्रशासनाची दुर्लक्ष**




बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ईदगाह स्थळी पेव्हर ब्लॉकचे काम पूर्ण

लिंबागणेश येथील ईदगाह प्रार्थना स्थळांच्या ठीकाणी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सरपंच बालासाहेब जाधव यांच्या पुढाकाराने अल्पसंख्याक निधीमधून पेव्हर ब्लॉकचे काम आणि साफसफाई करण्यात आली....... डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर



**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक आबा डक यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना संघर्ष लढा पत्रकार संघ माजलगाव**


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT